सक्षम प्राधिकारी क्र.३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स II, सेनापती बापट रोड, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३ /५८३ /२०२२
दिनांक :१९ /०५/२०२२

# "प्राथमिक पात्रता यादीचे जाहीर प्रकटन"

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे" या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांनी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गट नं.१४५८(पै), १५१३(पै), १५१४ (पै), म्हेत्रे वस्ती, भिमशक्तीनगर, चिखली, पिंपरी चिंचवड, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ६४७१.३७ चौ.मी. ह्या क्षेत्रातील (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी क्र. सप्रा/झोपुप्रा -३//६१७/२०२१, दि.२७/०४/२०२० अन्वये प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहीर प्रकटन प्रसिध्द केले आहे; आणि

ज्याअर्थी, या प्रकटनास अनुसरुन शासनाच्या निर्णय व आदेशान्वये उक्त झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांची यादी तयार करणेत आली असून, झोपडीधारकांनी त्यांची निवासी / बिगरनिवासी / संयुक्त पात्रता निश्चित करणेसाठी जोडपत्र ३/४ व पुराव्यांसह कागदपत्र सादर करणेबाबत कळविणेत आले असून, सदरच्या झोपडीधारकांचे उक्त जोडपत्र व पुराव्यांसह कागदपत्रे प्राधिकरणास प्राप्त झाले आहेत.

त्याअर्थी, प्राप्त झालेल्या जोडपत्र व त्यासोबतचे प्रपत्र आणि पुराव्यांची छाननी करुन खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या पुणे महानगरपालिका क्षेत्रातील गट नं.१४५८(पै), १५१३(पै), १५१४ (पै), म्हेत्रे वस्ती, भिमशक्तीनगर, चिखली, पिंपरी चिंचवड, पुणे या अंदाजे क्षेत्रफळ ६४७१.३७ चौ.मी. क्षेत्रातील झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी व परीशिष्टाचा गोषवारा तयार करण्यात आला असुन, सदरची यादी या जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

या प्राथमिक पात्रता यादीबाबत हित संबंध असलेल्या व्यक्तींनी त्यांची हरकत / दावा /सूचना / आक्षेप लेखी स्वरुपात व योग्य पुराव्यांसह सदरचे प्रकटन प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत सक्षम प्राधिकारी क्र. ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंवड क्षेत्र, पुणे मुथ्था चेंबर्स II, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६ या ठिकाणी दाखल करावी. अशा प्रकारे दाखल करणेत आलेल्या हरकती/ दावे/ सूचना / आक्षेप बाबत संबंधितांना वाजवी म्हणणे मांडण्याची संधी देणेत येईल. अर्जदारांचे म्हणणे व पुराव्यांची पडताळणी करुन, तसेच आवश्यक तर स्थळपाहणी करुण सदरची प्राथमिक पात्रता यादी अंतिम करणेत येईल.

अशाप्रकारे अंतिम करणेत आलेली प्राथमिक पात्रता यादी विहीत पध्दतीने प्रसिध्द करणेत येईल. या यादीमध्ये समावेश असलेल्या कोणत्याही नावाबाबत कोणताही आक्षेप असलेस तो पुराव्यांसह संबंधित उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा., पुणे यांचेकडे सादर करता येईल. उपरोक्त अंतिम पात्रता यादीमध्ये अपात्र असणाऱ्या झोपडीधारकास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५(१) अन्वये